स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड

येथील सामाजिक शास्त्रे विदयाशाखेअंतर्गत इतिहास विषयातील
विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीसाठी सादर करावयाचा शोध प्रबंधाचा आराखडा

: संशोधन विषय :

नेवासा तालुक्यातील सहकार चळवळीच्या इतिहासाचा समग्र अभ्यास (१९६०-२०१३)

: संशोधक :

श्री. नामदेव गोरक्षनाथ ठोंबळ

एम.ए.(इतिहास), नेट

अहमदनगर

: मार्गदर्शक :

डॉ. बबनराव पवार

प्राचार्य, कै. डॉ. शंकरराव सातव कला, वाणिज्य महाविदयालय

कळमनुरी, ता. कळमनुरी जि. हिंगोली पिन–४३१७०२,

: संशोधन केंद्र :

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ

नांदेड

२०१५-२०१६

*प्रास्ताविक :

अहमदनगर जिल्हा हा महाराष्ट्रातील सहकार चळवळीचा पाया मानला जातो. अहमदनगर जिल्ह्याचा इतिहास प्राचीन आहे. अहमदनगर जिल्हा हा पुर्वी दंडकारण्य म्हणून ओळखला जात होता. जिल्ह्यातील नेवासा येथे अश्मयुगापासुन मानवी वस्ती होती. अश्मयुगाचा तौलानिक काळ २० लाख वर्षाचा मानला जातो. संगमनेर तालुक्यात कन्हेघाट येथे नवाश्मयुगात मानव झोपडी बांधुन राहत होता व मातीची भांडी तयार करत होता. ताम्रपाषाणयुगाची संस्कृती जोर्वे या गावी संगमनेर येथे आढळून आली होती. अहमदनगर जिल्ह्यातील दायमाबाद येथील उत्खननातुन पाच वेगवेगळ्या ताम्रपाषाण संस्कृतीचे अस्तित्व लक्षात आले. ही संस्कृती हरप्पा व सिंधू संस्कृतीच्या समकालीन होती. दायमाबाद येथे साधारणतः १० हजारापेक्षा जास्त लोकसंख्या होती. या ठिकाणी सापडलेल्या पंचाधातूच्या मूर्ती जगात प्रसिध्द आहे.

सातवाहन काळात इतर स्थानाप्रमाणे या ठिकाणी भरभराट झालेली दिसते. इ.स. २ च्या शतकात रोमपर्यंत व्यापारी व सांस्कृतिक संबंध होते. सातवाहन साम्राज्य लयास गेल्यावर या भागावर अभिरांचे राज्य प्रस्थापित झाले. त्यानंतर ४ थ्या शतकाच्या शेवटी राष्ट्रकुटांची सत्ता २५५-४० मध्ये आली. त्यानंतर वाकाटकांचा उदय झाला व त्यांनी पाचव्या शतकापर्यंत राज्य केले. २५० ते ६१० पर्यंक कलसुरींनी सत्तास्थापन केली व ती दंतीदुर्गाने शेवटास नेली. १० व्या शतकात राष्ट्रकुटांचा पराभव करून पुन्हा चालुक्य सत्ता स्थापन झाली. परंतु ही सत्ता अधिक टिकली नाही व मांडलिक यादव स्वतंत्र झाले. यादवांनी १३१० ते १३२५ या कालखंडात राज्य केले. अलाउद्दीन खिलजीने १२९६ ते १३०६ अशा दोन वेळा स्वाऱ्या करून यादव घराणे संपुष्टात आणले. परंतु दिल्लीत खिलजींचा वध करून तुघलक सत्तेवर आले. १३४७ पर्यंत तुघलक सत्ता महाराष्ट्रावर होती. हसन गंगु बहामनीने तुघलकाविरूध्द बंड करून तुघलकांचे वर्चस्व संपुष्टात आणले. १४९० मध्ये बहामनी राज्याची शकले झाली व त्यामधून पाच शाह्या निर्माण झाल्या. निजामशाहीत अहमदनगरचा समावेश होता. प्रथमतः जुन्नर येथे निजामाची राजधानी होती. निजाम अहमदशाहच्या नावावरुन अहमदनगर हे नाव पडले.

सन १८१८ साली इंग्रजांनी पेशवाईचा शेवट करून तो भाग आपल्या राज्याला जोडला. त्यामध्ये अहमदनगर जिल्ह्याचाही समावेश होता. अहमदनगर शहराला जिल्ह्याचा दर्जा देण्यात आले. त्यामध्ये १२ तालुक्यांचा समावेश झाला. त्यामध्ये नेवासा हा एक तालुका होता.

नेवासा तालुक्याला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. प्राचीन काळी देव-दानवांनी समुद्रमंथन केले, असे आपण नेहमी ऐकतो आणि वाचतो. अमृतमंथनातून जी चौदा रत्ने बाहेर निघाली त्या रत्नापैकीच अमृत हे एक रत्न होय. या अमृताची देव दानवांमध्ये करावयाच्या वाटचाणीची कठीण कामगिरी मोहिनीरूप विष्णूने आपल्याकडे घेतली. अमृताची ज्या ठिकाणी वाटणी झाली ते ठिकाण नेवासा होय. येथे मोहिनीराजाचे प्राचीन मंदिर आहे. त्याचप्रमाणे नेवासा तालुक्याचा प्राचीन काली निधिवास, निवास असाही उल्लेख आढलतो. स्कंध पुराणापर्यंत महालय महात्म्य निधीवास या नावाचे स्पष्टीकरण करताना म्हणते, तारकासुरू दैत्याने कुबेरावर हल्ला केला. तेव्हा कुबेर घाबरून विष्णुकडे गेला. तेव्हा विष्णुने जी जागा दिली. तिथे कुबेर आपली संपत्ती घेऊन गेला. त्या स्थळी निधी ठेवला म्हणून ते गाव निधीवास. नेवासा येथील प्रवरा नदीच्या काठी एक दहा-वीस

पाषाणांची रास दाखवून तेच मुकुटेश्वरी देवीचे स्थान समजले जाते. अर्थात मुळचे मंदिर उद्ध्वस्त झाले असून ते अवशेष आहेत. परंतु असे सांगतात की, प्राचीन मंदिराची भिंत उद्ध्वस्त झाली नाही आणि त्याचमध्ये शिवालय सुरक्षित राहिले. या शिवालयाजवळ घडीव दगडीकुंड मिळून आले आहे आणि दानवांनी याच कुंडात अमृत लपवून ठेवले, असी अख्यायिका आहे.

ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या अहमदनगर जिल्हा व त्यातील नेवासा तालुका यांचे सहकार चळवळीतील योगदान मोलाचे आहे. इंग्रज विचारवंत रॉबर्ट ओवेन यांच्या प्रेरणेने २७ डिसेंबर १८४४ रोजी सहकार चळवळ प्रत्यक्षात अस्तित्वात आली. भारतात १८८२ नंतर महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तामिळनाडू या राज्यात सहकाराची बीजे रुजली. महाराष्ट्रात अहमदनगर जिल्ह्याने या चळवळीचे पथदर्शक बनुन विशेषतः १९६० नंतर सहकार गतीमान केला. १८५० च्या आसपास अहमदनगर जिल्ह्यात सर्वात जास्त ७ सहकारी कारखाने होते. स्वातंत्र्यानंतर त्यात वाढ होत जावुन आज महाराष्ट्रात सर्वात जास्त १८ सहकारी कारखाने अहमदनगर जिल्ह्यात आहे. त्यातही नेवासा तालुक्यात २ सहकारी साखर कारखाने आहेत. तसेच सहकारी सोसायट्या, सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, सहकारी दुध संस्था, सहकारी मजुर संस्था अशा विविध संस्थांचे एक व्यापक जाळे नेवासा तालुक्यात उभारले गेले आहे.

सहकार चळवळीचा इतिहास हा रचनात्मक विकासाचा इतिहास असून शेतकरी व कष्टकऱ्यांनी संघर्ष करून सहकारी संस्थांची उभारणी केली आणि त्याचा पध्दतशीर विकास केला. सहकाराला आज मधूर फळे आली असली तरी सहकारी चळवळीचा आरंभीचा इतिहास मात्र संघर्षमय आहे. या चळवळीच्या बलशाली बैठकीमुळे नेवासा तालुक्यात सहकार चळवळीने आपला पाया भक्कम केला. तरवडी येथे मुकुंदराव पाटील यांनी 'दिनमित्र' हे पत्र सुरू केले आणि त्यानंतर तालुक्यात सत्यशोधक चळवळीचा विस्तार झाला. तसेच प्राथमिक शेतकरी सहकारी पतसंस्था नेवासा तालुक्यात प्रारंभापासूनच मोठ्या प्रमाणात स्थापन करण्यात आल्या. त्याचे पर्यावसन म्हणजे नेवासा तालुक्यात सहकार चळवळ व्यापक बनली. या पार्श्वभूमीवर 'नेवासा तालुक्यातील सहकार चळवळीच्या इतिहासाचा समग्र अभ्यास' (१९६०-२०१३) हा विषय संशोधनासाठी निवडला असुन नेवासा तालुक्यातील सहकारी चळवळीचा समृध्द इतिहास अभ्यासणे किती महत्त्वाचे आहे हे लक्षात येते.

※ विषयाचे संशोधनाचे शिर्षक :

"नेवासा तालुक्यातील सहकार चळवळीच्या इतिहासाचा समग्र अभ्यास (१९६०-२०१३)"

※ संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा हा तालुका सहकार चळवळीत विलक्षण प्रगती केलेला तालुका आहे. विशेषतः १९६० ते २०१३ या कालखंडात नेवासा तालुक्यातील सहकार चळवळ झपाट्याने विकसित झाली आहे. या तालुक्यातील सहकार चळवळीचा अभ्यास केल्यास या तालुक्याच्या सर्वांगीण विकासात सहकार चळवळीचे काय योगदान आहे, हे समजण्यास मदत मिळेल. या संशोदन अभ्यासाचा उद्देश खालीलप्रमाणे सांगता येईल :

१) सहकार चळवळीच्या सामाजिक विकासातील योगदानाच अभ्यास करणे.

२) सहकार चळवळीमुळे नेवासा तालुक्यात घडून आलेल्या राजकीय परिवर्तनाचा अभ्यास करणे.

३) सहकार चळवळीचे नेवासा तालुक्याच्या आर्थिक विकासातील योगदान अभ्यासणे.

४) सहकार चळवळीतून नेवासा तालुक्यात साधलेल्या शैक्षणिक विकासाची नोंद घेणे.

५) सहकार चळवळीच्या माध्यमातून नेवासा तालुक्यात निर्माण झालेल्या पूरक उद्योगांचा आढावा घेणे.

✻ संशोधनाची गृहितके :

१) सहकार चळवळीमुळे नेवासा तालुक्याच्या सामाजिक विकासाला मदत झाली.

२) सहकार चळवळीमुळे नेवासा तालुक्यात राजकीय परिवर्तन झाले.

३) सहकार चळवळीमुळे नेवासा तालुक्यात शैक्षणिक विकास व परिवर्तन झाले.

४) सहकार चळवळीमुळे नेवासा तालुक्याचा आर्थिक विकास झाला.

५) सहकार चळवळीमुळे नेवासा तालुक्यातील पायाभुत सुविधांचा विकास झाला.

✻ संशोधन विषयाची गरज :

अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीवर यापूर्वी व्यापक संशोधन करण्यात आले आहे. अहमदनगर जिल्ह्याला सहकार चळवळीतील अग्रस्थान मिळवून देण्यात जिल्ह्यातील तालुक्यांचे योगदान मोलाचे आहे. त्यामुळे अहमदनगर जिल्ह्यातील एखाद्या तालुक्यातील सहकार चळवळीवर संशोधन करणे गरजेचे आहे. त्यातही नेवासा तालुक्याचे अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीतील योगदान आमुलाग्र आहे. म्हणून या विषयाची निवड करण्यात आली आहे.

✻ संशोधनाची व्याप्ती :

या संशोधनात विषयात नेवासा तालुक्यातील सहकार चळवळीमुळे सन १९६० ते २०१३ या कालखंडातील नेवासा तालुक्याच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक बाबींवर झालेल्या परिणामांचा अभ्यास केला जाणार आहे.

✻ संशोधनाची मर्यादा :

१) या संशोधन विषयात अहमदनगर जिल्ह्यातील फक्त नेवासा तालुक्यातील सहकार चळवळीच्या इतिहासाचा समग्र अभ्यास केला जाणार आहे.

२) या संशोधन विषयात नेवासा तालुक्यातील १९६० ते २०१३ या विशिष्ट कालखंडातील सहकार चळवळीचा अभ्यास केला जाणार आहे. १९६० पूर्वीच्या व २०१३ नंतरच्या सहकार चळवळीच्या ह्या संशोधन विषयात अभ्यास केला जाणार नाही.

❊ संशोधन विषयाचे महत्व :

सहकार ही एक अशी सामाजिक संस्था आहे की, जिच्यामध्ये विविध धर्म, पंथ, वर्ग, जाती आर्थिकदृष्ट्या दुर्बल व शोषीत असा सर्व वर्गातील व्यक्तींना समता व समानतेच्या धाग्याने एकत्र बांधले जाते. यातून संघर्ष विरहीत समाजाची निर्मिती हे सहकाराचे मुलभूत तत्वज्ञान बनले आहे. सहकारात व्यक्ती हितापेक्षा सामुहिक हिताचा विचार केला जातो. व्यापारी वर्गाच्या नफेखोरी वृत्तीमुळे बाजारपेठेत टंचाई, भेसळ इ. बाबी घुसतात यामुळे सामान्य ग्राहक वर्ग भरडला जातो. परंतु सहकारी संस्था या क्षेत्रात उतरल्यामुळे एकात्मता, समता व बंधुत्वाच्या गुणांचा विकास केला जातो. समाजातील सामान्य दुर्बल शोषित घटकांना एकत्रित आणून एकता निर्माण करुन एकसंघपणे कार्य करीत असतात. उपलब्ध परिस्थितीतून आणि आर्थिक मागासलेपणातून विकासाकडे वाटचाल करण्याची संधी सहकारामुळे उपलब्ध होत असते. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी नियोजनबध्द विकासात सहकार चळवळ पुरक ठरली आहे.

देशाच्या अर्थव्यवस्थेत सहकार क्षेत्राने मोठी भर घातली आहे. कृषि, बँका, विमा, बांधकाम, कारखाने, पतसंस्था, दुग्धव्यवसाय व सोसायट्या आदी विविध क्षेत्रात आपले पाय रोवल्याने मोठ्या प्रमाणात रोजगार व स्वयंरोजगाराची निर्मिती झाली आहे. सहकारामुळे सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक विकास घडवून आणणे शक्य झाले आहे. हे सहकार क्षेत्राचे महत्त्वाचे कार्य आहे.

पश्चिम भारतातील सहकारी चळवळीचे जनक वैकुंठभाई मेहता यांनी सहकाराची संकल्पना स्पष्ट करताना म्हटले होते की, Co-operation is a vast movement which promotes voluntary association of individuals having common needs who combine towards the achievements of common economic ends. सारख्याच गरजा असलेल्या व्यक्ती त्यांची उद्दिष्टपूर्ती करण्याकरिता स्वेच्छेने एकत्र येतात. सहकारी संगठन हे एक स्वेच्छा संगठन आहे, व्यक्ती आणि आपल्या मनाने व इच्छेने, मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी एकत्र येतात ही सहकाराची मूळ कल्पनाच या व्याख्येत त्यांनी मांडली आहे.

गोदावरी, प्रवरा व मुळा या नद्यांच्या खोऱ्यात असलेल्या नेवासा तालुक्यात १९२३ साली पहिली पतसंस्था स्थापन झाली. त्यानंतर या प्रदेशात सहकारी चळवळीला गती प्राप्त झाली. प्रथम सत्यशोधक चळवळ आणि नंतर साम्यवादी चळवळ यामुळे तालुक्यात राजकीय जागृती वाढली होती.

नेवासा तालुक्यात १९६० नंतर साम्यवादी चळवळीने चांगले मूळ धरले होते. पहिल्या फळीतील साम्यवादी कार्यकर्त्यात कॉ.वकीलराव लंघे, मारुतराव घुले पाटील, एस.ए.पाटील, यशवंतराव गडाख, कॉ.वसंतराव होंडे आदींनी भक्कम असे कार्य केले होते.

भांडवलशाहीला विरोध करताना सहकारी तत्त्वावर शेतकऱ्यांनी एकत्र येऊन विकासाचे प्रकल्प हाती घेतले तर सामान्य शेतकऱ्यांचा कायापालट होऊ शकतो हे सूत्र घेऊन अनेक सत्यशोधक व साम्यवादी कार्यकर्ते सहकारी चळवळीकडे वळले. त्यांनी सहकार क्षेत्रात आपल्या क्षमतांचा वापर करुन भरघोस कार्य केले. त्यामुळे सहकारी चळवळ भक्कम आणि प्रगतशील बनली. गेल्या ७० वर्षात सहकारी चळवळीत दोन पिढ्यांनी आपले कर्तृत्व गाजवले आहे. यापैकी पहिल्या पिढीतील कार्यकर्ते हे स्वातंत्र्यपूर्व काळातील ध्येयवादाने एकनिष्ठ होऊन कार्य करत होते तर स्वातंत्र्योत्तर काळात मात्र हा ध्येयवाद थोडासा घसरल्याचे दिसून येते.

सहकारी चळवळीतून शिक्षण संस्था, आरोग्य संस्था तसेच अनेक लघुउद्योग सुरू झाले. कृषी आधारित लघुउद्योगांनाही मोठी चालना मिळाली. एका बाजूला सहकारी चळवळीचा संस्थात्मक व्यापक वाढत असताना दुसरीकडे सहकारी चळवळीची घसरणही सुरू झाली. सहकारी चळवळीच्या यशापयशाचे मूल्यमापन करणे हा या प्रबंधाचा हेतू असून सहकारातील यशस्थाने व मर्यादा यांचा या प्रबंधात आढावा घ्यावयाचा आहे.

* संबंधित साहित्याचा आढावा :

महाराष्ट्रातील व संबंध सहकारी चळवळी वरील अनेक शोध प्रबंध व लघुप्रबंध यासारखे संशोधनात्मक लेख या सर्व साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे.

१) तात्याबा पुरी – यांनी 'मराठवाड्यातील सहकार चळवळ आणि राजकीय विकास विशेष संदर्भ–बीड जिल्हा' या विषयावर डॉ.बा. आ. म. विद्यापीठात प्रबंध सादर केला असून त्यांनी आपल्या शोध प्रबंधात प्राथमिक व दुय्यम सामग्रींचा आधार घेतला आहे. तसेच सहकारक्षेत्राशी निगडीत असणाऱ्या नेत्यांकडून व सामाजिक कार्यकर्त्यांकडून मुलाखतीद्वारे माहिती संकलित केली आहे. श्री. तात्यापुरी यांनी आपल्या शोध प्रबंधात पुढील निष्कर्ष मांडले आहेत. सहकारातून राजकारणात उदय, ऊस उत्पादकांची उदासीनता, साखर संचालकांच्या निर्णयाचा अभाव, अतिरिक्त कर्मचारी भरती, आर्थिक उधळपट्टी, घराणेशाहीचा प्रभाव इत्यादी पैलुवर प्रकाश टाकला आहे.

२) डॉ.नीना जगताप यांनी अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीचा इतिहास अभ्यासला आहे. त्यामध्ये त्यांनी सहकारी साखर कारखाने, पतसंस्था, सहकारी बँका, सहकारी दूध संस्था, शेतकी व भाजीपाला सहकारी संस्था इत्यादींचा अभ्यास केला आहे. त्यांनी त्यांच्या अभ्यासात सहकार चळवळीची विविध क्षेत्रे तपासली आहे. परंतु त्यामध्ये नेतृत्वाचा विकास तसेच दक्षिण व उत्तर अहमदनगर जिल्ह्यातील असमतोलाची कारणे याकडे दुर्लक्ष केले आहे.

३) प्रा.डॉ. दराडे संभाजी सोपानराव यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथे ''औरंगाबाद जिल्ह्यातील सहकार चळवळीचा इतिहास : सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक प्रभावाचे अध्ययन (१९६०–२०१३)'' हा प्रबंध सादर केला आहे. त्यांनी औरंगाबाद जिल्ह्याच्या सहकारी चळवळीचा समग्र आढावा घेऊन चळवळीचे मूल्यमापन केले आहे. त्या चळवळीतून नेतृत्वाचा विकास कसा होतो. तसेच जिल्ह्यातील सहकारी चळवळीच्या असमतोलाची कारणे दिली आहेत. त्यांच्या अभ्यासातून समाजाला दिशा मिळू शकते.

४) रघुनाथ शेटे यांनी 'सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीतील राजकीय नेतृत्वाचे योगदान : नांदेड विभागाचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या सामाजिक शास्त्र विद्या शाखेतील राज्यशास्त्र विषयाच्या विद्यावाचस्पती पदवीसाठी सादर केलेला शोध प्रबंध

५) वि.जे. वाकळे यांनी ''महाराष्ट्रातील साखर उद्योगाचे राजकारण व विकासातील समस्या'' या विषयावर डॉ.बा.आ. म. विद्यापीठ, औरंगाबाद येथे सादर केलेला शोध प्रबंध.

६) जि.एस. कुलकर्णी यांनी ''महाराष्ट्रातील सहकारी नेतृत्व'' (सहकारी साखर कारखान्याच्या संदर्भात पुणे व नगर जिल्ह्याच्या विशेष संदर्भासह) पुणे विद्यापीठ, पुणे येथे सादर केलेला शोध प्रबंध.

❊ संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनसामुग्रीचा आधार घेण्यात येणार आहे. प्राथमिक माहिती संकलीत करण्यासाठी प्रश्नावलीचा वापर करण्यात येईल. वर्णनात्मक आराखडा म्हणजे साधन सामुग्रीच्या आधारे इतिहासाचे वस्तुनिष्ठ वर्णन करणे होय, असे वर्णन करताना सहकार चळवळीतील नेत्यांची आत्मचरित्रे, चरित्र्यग्रंथ, स्मरणिका, वृत्तपत्रातील लेख तसेच मुलाखती याबरोबरच सामाजिक पाहणी आशय विश्लेषण मुलाखती इ. तंत्राचा वापर करुन प्रकाशित साहित्याचा पडताळा घेण्यात येईल.

या संशोधन कार्यासाठी नेवासा तालुक्यातील सहकारी साखर कारखाने, इतर सहकारी संस्था, अनेक उद्योग व लघुद्योग, सहकार चळवळीशी संबंधित शैक्षणिक संस्था इ.ठिकाणी भेटी देवून माहिती संकलीत करण्यात येईल. याशिवाय सहकार चळवळीशी निगडीत व्यक्तींच्या मुलाखती घेण्यात येतील. साधनांची जुळणी व तपासणी करताना मुळ कागदपत्रे शोधुन त्याआधारे ग्रंथ व कागदपत्रात न आलेली माहिती प्रत्यक्ष कार्यकर्त्यांच्या तोंडी मुलाखतीतून अंतर भरून काढण्यासाठी उपयोगी पडेल. तसेच प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षणात्मक पध्दतीचाही अवलंब करण्यात येणार आहे.

❊ नियोजित प्रकरण योजना ❊

प्रकरण १ : प्रस्तावना

या प्रकरणात अहमदनगर जिल्हा व त्यातील नेवासा तालुक्याची ऐतिहासिक, भौगोलिक पार्श्वभूमी देवून सहकाराची संकल्पना स्पष्ट करण्यात येईल. तसेच नेवासा तालुक्यातील सत्यशोधक चळवळ, साम्यवादी चळवळ, स्वातंत्र्याचा लढा, महाराष्ट्र राज्याची स्थापना, सहकार कायद्याचा अवलंब यांचा आढावा घेवून सहकार चळवळीच्या उदयापूर्वीची व उदयानंतरची परिस्थिती यांची तुलना करण्यात येईल. नेवासा तालुक्यात २० व्या शतकात ज्या सहकारी चळवळी झाल्या त्यांचा शास्त्रीय आढावा घेण्यात येईल.

प्रकरण २ : संशोधन पध्दती

या प्रकरणात वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात येईल. हा आराखडा का व कसा वापरला आहे. तो वापरताना कोणती काळजी घ्यावयाची आहे. हे पैलु स्पष्ट करण्यात येतील. जेव्हा विपूल प्रकाशित सामुग्री उपलब्ध असते तेव्हा वर्णनात्मक आराखडा वापरुन सत्याचा शोध चांगल्याप्रकारे घेता येतो हे सुत्र लक्षात घेऊन येथे वर्णनात्मक आराखड्यातील बारकावे स्पष्ट करण्यात येतील. सहकार चळवळीच्या इतिहासाबाबत प्रमुख कार्यकर्त्यांच्या मुलाखती प्रश्नावलीच्या आधारे घेण्यात येतील व त्याआधारे इतिहासावर नवा प्रकाश टाकण्यात येईल.

प्रकरण ३ : नेवासा तालुक्यातील सहकारी चळवळीचा उगम व विकास (सन १९६० ते २०१३)

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर मा.यशवंतराव चव्हाण यांनी सहकारी चळवळीला जोमदार रुप देण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नास अहमदनगर जिल्ह्यातून विशेषतः नेवासा तालुक्यातून उत्साहाने प्रतिसाद लाभला. तथापि त्यापूर्वीच म्हणजे १९४८ सालीच अहमदनगर जिल्ह्यात पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी डॉ.धनंजय गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखाली आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना स्थापन केला होता. त्याचा परिणाम नेवासा तालुक्यातील सहकार चळवळीवरही झाला. नेवासा तालुक्यात सहकारी साखर कारखाने, सहकारी सोसायट्या, पतसंस्था, सहकारी दूध संस्था, उपसा जलसिंचन योजना, पाणी वाटप संस्था, या संस्थांची सहकारी तत्त्वावर स्थापना झाली.

प्रकरण ४ : नेवासा तालुक्यातील सहकार चळवळीचा विस्तार आणि प्रसार :

या प्रकरणात नेवासा तालुक्यातील सहकार चळवळीच्या कार्यातून विविध सहकारी संस्थांची माहिती देण्यात येईल. अहमदनगर जिल्ह्यात सहकारी साखर कारखान्यांनी आपल्या कार्याचा विस्तार व प्रसार कशाप्रकारे केला, तसेच पतसंस्थेबरोबरच सहकारी दुध संस्था, उपसा जलसिंचन योजना, पाणी वाटप संस्था, फळ प्रक्रिया उद्योग, भाजीपाला उद्योग इत्यादींना सहकारी तत्त्वावर चालना देण्यात आली. याच काळात नेवासा तालुक्याच्या शेजारील तालुक्यात राहुरी येथे कृषी विद्यापीठाची १९६८ मध्ये स्थापना झाली आणि या विद्यापीठाने जिल्ह्याबरोबरच नेवासा तालुक्यातील शेतीच्या क्षेत्रात पायाभूत संशोधन कार्य केले. तसेच सहकारी चळवळीच्या क्षेत्रातुन म्हणजेच प्रकल्पातुन सामाजिक व आर्थिक परिवर्तनाबरोबरच इतर कल्याणकारी उपक्रम सुरू झाले. त्यांचाही आढावा या प्रकरणात घेण्यात येईल. शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळवून देण्यासाठी कृषीपूरक आधारित लघुउद्योग स्थापन करण्यावर भर देण्यात येऊ लागला. मद्यार्क प्रकल्प, इथेनॉल प्रकल्प, कागद प्रकल्प, सहविजनिर्मिती इत्यादी प्रकल्पांचा उल्लेख केला जाईल.

तसेच २०१३ साली झालेल्या ९७ व्या घटनादुरुस्तीमुळे नेवासा तालुक्यातील सहकारी चळवळीवर कोणते आमुलाग्र परिणाम झाले ? याचा अभ्यासही या प्रकरणात केला जाणार आहे.

प्रकरण ५ : सहकार चळवळीमुळे नेवासा तालुक्यात झालेला सामाजिक, आर्थिक व राजकीय विकास

प्रस्तुत प्रकरणात तालुक्यातील विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून घडुन आलेल्या विकासाचा आढावा घेण्यात येईल. या सहकारी चळवळीच्या माध्यमातून नेतृत्वाने केलेल्या कार्याचा आढावा घेण्यात येईल. त्यांच्या कार्यातून सामाजिक व आर्थिक विकासाची जडण–घडण कशाप्रकारे झाली याचा शोध घेऊन मांडणी करण्यात येईल. नेवासा तालुक्यामध्ये श्री.यशवंतराव गडाख, स्व.श्री. मारुतराव घुले, वसंतराव होंडे, एस.ए. पाटील, जबाजी फाटके, अण्णासाहेब सोनावणे यांच्या राजकीय नेतृत्वाचा विकास सहकार चळवळीच्या

माध्यमातून कसा झाला याचा आढावा घेण्यात येईल. सहकार चळवळीच्या जोमदार वाढीमुळे नेवासा तालुक्यातील जनतेचे दरडोई उत्पन्न वाढले, राहनीमान उंचावले व तालुक्यात अर्थिक सुबत्ता आली आणि त्यामुळे नेवासा तालुका सुजलाम सुफलाम झाला याचा आढावाही या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण ६ : सहकार चळवळीमुळे नेवासा तालुक्यात घडुन आलेला शैक्षणिक बदल व सांस्कृतिक विकास

सहकार चळवलीने आर्थिक सबलीकरणाबरोबरच शैक्षणिक क्षेत्रात भरघोस असे कार्य नेवासा तालुक्यात आरंभिले. सहकार चळवळीतून पुढे आलेल्या नवीन राजकीय नेतृत्वांनी शैक्षणिक संस्थांचे जाळे तालुक्यात उभारले. उदा. यशवंतराव गडाख यांनी मुळा शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून तालुक्यात शाळा, कॉलेज, कृषी महाविद्यालय, औषधशास्त्र महाविद्यालय, दंतवैद्यक महाविद्यालय या शैक्षणिक संस्थांची स्थापना तालुक्यात केली. यामुळे तालुक्यातील मुला–मुलींना योग्य फी मध्ये व मुळ परिसरात राहुन शिक्षणाची संधी मिळाली. त्यामुळे तालुक्यातील युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली. या संस्थांमुळे संबंधित पुरक व्यवसायांनाही चालना मिळाली. तसेच तालुक्याचा साक्षरतेचा दरही वाढला व बेरोजगारीचे प्रमाणही कसे कमी झाले, याचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे. या तालुक्यात साहित्य, कला व संस्कृती संवर्धनाच्या चळवळींना उत्तेजन देण्याचे कार्य सहकारी चळवळीमुळे शक्य झाले आहे. शैक्षणिक पाहणीचा अहवाल देवून ग्रंथातील संदर्भ अधिक भक्कम करण्यात येतील.

प्रकरण ७ : निष्कर्ष

या प्रकरणामध्ये मागील प्रकरणांचा सारांश देऊन अंतिम निष्कर्ष मांडण्यात येतील. तसेच सहकारी चळवळीबाबत नवे प्रमेय मांडून २१ व्या शतकात व्यावसायिक दर्जा उंचावून आणि अधिक पारदर्शकता ठेवून सहकारी चळवळीला वाटचाल कशी करावी लागेल याबाबतचे निदान करण्यात येईल. या प्रकरणात संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहीतके यांना केंद्रबूत मानुन चिकित्सक अभ्यास केल्यास निघणारे निष्कर्ष व निरीक्षणे नोंदविले जातील.

: **मार्गदर्शक** :
डॉ. बबनराव पवार
प्राचार्य तथा संशोधन मार्गदर्शक
कै. डॉ. शंकरराव सातव कला,
वाणिज्य महाविदयालय, कळमनुरी

: **संशोधक** :
श्री. नामदेव गोरक्षनाथ ठोंबळ
एम.ए.(इतिहास) नेट
अहमदनगर

* संदर्भ ग्रंथसूची :

१) गाडगीळ धनंजय रा. – सहकारी लोकराज्य, गोखले अर्थशास्त्र संस्था पुणे.

२) गंधे नारायण – प्रवराकाठची संस्कृती, ज्ञानेश प्रिंटर्स, अहमदनगर

३) कसबे रावसाहेब (संपा) – शेती आणि सहकार, भाऊसाहेब थोरात गौरव समिती

४) कसबे रावसाहेब आणि लामखडे मा.रा. – सहकार तत्त्व व्यवहार, श्री विद्या प्रकाशन पुणे आणि व्यवस्थापन

५) थोरात भाऊसाहेब – अमृतमंथन, अमेय प्रकाशन पुणे, १९९७

६) थोरात भाऊसाहेब – अमृतगाथा, अमेय प्रकाशन पुणे, २०००

७) गडाख यशवंतराव – अर्धविराम, ऋतुरंग प्रकाशन, मुंबई, २००५

८) गडाख यशवंतराव – सहवास, ऋतुरंग प्रकाश, मुंबई

९) आळवंडी जी.एन – सहकारतत्त्व व्यवहार, राजेंद्र प्रकाशन, सोलापूर

१०) के.सागर – असा हा महाराष्ट्र, के.सागर प्रकाशन, पुणे

११) भावे सविता, कृषी क्रांतीचे प्रणेते – आण्णासाहेब शिंदे, पुणे, १९८५

१२) पाटील माधवराव (संपा) सत्यवेध, दीनमित्रकार मुकुंदराव पाटील स्मारक समिती, तरवडी १९९८

१३) दास्ताने संतोष – महाराष्ट्र २०११, दास्ताने रामचंद्र कंपनी, पुणे

१४) पंडीत जवाहरलाल नेहरू – सहकारीता, रस्ता साहित्य मंडळ प्रकाशन, नवी दिल्ली

१५) गाडगीळ धनंजय – निवडक भाषणे व लेख, खंड १ व २, पुणे १९७०

१६) प्रा. कुलकर्णी – सहकाराचा सिध्दांत व इतिहास प्रगती प्रकाशन, पुणे

१७) धाणेकर विद्या – सहकारी संस्थांचा कारभार, ठोकळ प्रकाशन पुणे

१८) गाडगीळ धनंजय – सहकारी–लोकराज्य, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे

१९) कामत गो.स. – मॅनेजमेंट ऑफ को–ऑपरेटिव्ह, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे फॅक्टरीज इन महाराष्ट्र

२०) विखे बाळासाहेब – पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील, विखे फौंडेसन, प्रवरानगर, ए–प्रोफाईल

२१) श्रुती कुलकर्णी – ग्रामीण अर्थव्यवस्था व सहकार, पिंपळापुरे ॲण्ड कं. प्रकाशन, नागपूर

२२) महाराष्ट्रातील सहकारी चळवळ – सहकार आयुक्त व निंबळक सहकारी संस्था, एका दृष्टीक्षेपात – २००५, महाराष्ट्र राज्य पुणे

२३) राजा मंगळवेढेकर – भूमिपूत्र, प्रवरा प्रकाशन, प्रवरानगर १९७७

२४) शिवाजी सावंत – लढत (भाग–१) अध्यक्ष स्व.डॉ.विखे पा. फौंडेशन, प्रवरानगर, १९८५

२५) शिवाजी सावंत – लढत (भाग–२) अध्यक्ष स्व.डॉ.विखे पा.फौंडेशन, प्रवरानगर, १९८६

२६) शिवाजी सावंत – महाराष्ट्राचे शिल्पकार पद्मश्री विखे पाटील, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई २००२

२७) तुपे सु.दा. – भारतातील सहकारी संस्थांची कार्यपध्दती, द्वारका प्रकाशन, पुणे, १९९२

२८) साळुंके आर.एस. – महाराष्ट्रातील सहकारी कृषिपतपुरवठा, संवेदन प्रकाशन, औरंगाबाद, १९८०

२९) जाधव टी.एस. – सहकारी रचना व कार्यपध्दती, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, म. पुणे.

३०) सहकारी साखर कारखाने व सहकारी संस्था यांचे वार्षिक अहवाल

३१) सवदी, द मेगा स्टेट महाराष्ट्र, निराली प्रकाशन पुणे

३२) सराफ मोहन – सहकार, नवनिधी प्रकाशन

३३) सहकाराची शासकीय परिपत्रके

३४) शासकीय संख्यात्मक माहिती

३५) प्रश्नावली

३६) मुलाखती

* इतर संदर्भ साहित्य :

१) नियतकालिके

  १) समाज प्रबोधन पत्रिका

  २) सहकारी विश्व

  ३) सहकार दर्शन

  ४) सहकारी महाराष्ट्र

२) टेलिव्हीजन

३) इंटरनेट

४) वृत्तपत्रे

: मार्गदर्शक :
डॉ. बबनराव पवार
प्राचार्य तथा संशोधन मार्गदर्शक
कै. डॉ. शंकरराव सातव कला,
वाणिज्य महाविद्यालय, कळमनुरी

: संशोधक :
श्री. नामदेव गोरक्षनाथ ठोंबळ
एम.ए.(इतिहास) नेट
अहमदनगर

ठिकाण :

दिनांक : / /२०१